महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

**पी.आर-३/सबसिडी/१२६९** **दिनांक : १३/०१/२०१०**

# वाणिज्य परिपत्रक क्र. १०९

**विषय :-** राज्यातील मराठवाडा व विदर्भातील चंद्रपूर व यवतमाळ जिल्हे व उर्वरित महाराष्ट्रातील टंचाईग्रस्त तालुक्यात टंचाई सदृष्य परिस्थिती जाहीर करुन उपाययोजना करण्याबाबत.
-- वीज बिलात सवलत देण्याबाबत.

**संदर्भ :-** १) शासन निणय क्र. एससीवाय २००९/प्र.क्र. ९७/म-७ दिनांक ०७.०८.२००९.
२) शासनाचे पत्र क्र. संकीर्ण २००९ /प्र.क्र.८६६/ऊर्जा-५ दिनांक ०४.११.२००९.

राज्यात सन २००९ - १० मध्ये संपूर्ण मराठवाडा भागात, विदर्भातील यवतमाळ, चंद्रपूर जिल्हयात व इतर जिल्हयातील काही तालुक्यामध्ये सरासरीच्या तुलनेत ५० टक्के पेक्षा कमी पाऊस पडला असल्यामुळे टंचाई सदृश स्थिती निर्माण झालेली आहे.

वरील संदर्भ क्र. १ अन्वये शासनाने राज्यातील मराठवाडा व विदर्भातील चंद्रपूर व यवतमाळ जिल्हे व उर्वरित महाराष्ट्रातील टंचाईग्रस्त तालुक्यात (विवरण पत्र "अ" व विवरण पत्र "ब" मध्ये नमुद केलेले आहे) टंचाई सदृष्य परिस्थिती जाहीर करुन उपाययोजना करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

सदर शासन निर्णयात दिनांक १५ ऑगस्ट २००९ पर्यत ज्या तालुक्यांमध्ये पर्जन्यमान सरासरीच्या तुलनेत ५० टक्के पेक्षा कमी असेल त्या सर्व तालुक्यांनाही सवलती लागू होतील व त्यानुसार टंचाईग्रस्त गावांतील कृषी ग्राहकांना वीज बिलामध्ये ३३ १/३ टक्के इतकी सवलत देण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.

या अनुषंगाने सर्व संबंधीत क्षेत्रिय अधिका-यांना सुचना देण्यात येत आहेत की, शासनाच्या प्रचलित धोरणानुसार टंचाईग्रस्त गावांतील बाधीत कृषी ग्राहकांचा विद्युत पुरवठा वीज देयकाच्या थकीत बिलामुळे खंडीत करण्यात येऊ नये व शासन आदेशाप्रमाणे सदर गावांतील कृषी ग्राहकांना वीज बिलामध्ये ३३ १/३ टक्के (म्हणजेच ३३.३३ टक्के) इतकी सवलत देण्यात यावी. सदर ३३.३३ टक्के सवलत कृषी ग्राहकांना देण्यात येणा-या शासनाच्या प्रचलित सवलतीच्या दरामध्ये देण्यात यावी.

जिल्हा निहाय टंचाईग्रस्त गावांची संख्या विवरण पत्र "अ" व विवरण पत्र "ब" मध्ये नमुद करण्यात आलेली असुन टंचाईग्रस्त गावांची यादी त्वरीत जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावी.

सन २००९-१० या वर्षाकरीता टंचाई परिस्थिती जाहीर झालेल्या गावांची व कृषी ग्राहकांची माहिती संबंधीत माहिती व तंत्रज्ञान विभागास देण्यात यावी. जेणेकरुन या सवलत देण्यामुळे शासनावर पडणा-या आर्थिक बोजाच्या

रकमेची परिगणना माहिती व तंत्रज्ञान विभागास करता येईल व शासनाकडे पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव पाठविण्यात येईल.

**सहपत्र :- वरीलप्रमाणे.**

(स्वाक्षरी)
**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत सस्नेह रवाना :-**

मुख्य महाव्यवस्थापक, (माहिती व तंत्रज्ञान), म.रा.वि.वितरण कंपनी मर्यादित, मुंबई.

-- आपणास कळविण्यात येते की, वरील विषया संदर्भात सन २००९-१० या वर्षात टंचाईग्रस्त गावांतील कृषी ग्राहकांना वीज बिलात शासनाच्या प्रचलित सवलतीच्या दरात ३३ १/३ टक्के सवलत दिल्यास वितरण कंपनीवर पडणा-या आर्थिक बोजाची परिमंडळ व ग्राहक संख्या निहाय माहिती शासनाकडून आर्थिक पूर्तत: करण्याकरीता त्वरीत पाठविण्यात यावी. तसेच शासनाकडून अनुदानाची रक्कम प्राप्त झाल्यावर सदर सूट कृषी ग्राहकांना देण्यात यावी.

**प्रत माहितीस रवाना :-**

सर्व मुख्य अभियंता, सं व सु परिमंडळ, (महावितरण)
सर्व अधिक्षक अभियंता, सं व सु मंडळ, महावितरण,
सर्व कार्यकारी अभियंता, सं व सु विभाग, महावितरण,
सर्व उपविभागीय अभियंता / सहाय्यक अभियंता, सं व सु उपविभाग, महावितरण,

**प्रत सविनय सादर :-**

मा. सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई.
१३ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, कुलाबा, मुंबई ४०० ००५.

**प्रत सविनय सादर :-**

१) व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.मंडळ, होल्डींग कंपनी मर्यादित, मुंबई.
२) व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, मुंबई.
३) व्यवस्थापकीय संचालक, म.रा.ट्रान्समिशन कंपनी मर्यादित, मुंबई.
४) व्यवस्थापकीय संचालक, म.रा. पॉवर जनरेशन, कंपनी मर्यादित, मुंबई.
५) संचालक (संचलन), महावितरण.
६) संचालक (वित्त), महावितरण.

**प्रत सस्नेह रवाना :-**

१) कार्यकारी संचालक (वाणिज्य), महावितरण.
२) कार्यकारी संचालक (प्रकल्प), महावितरण.
३) कार्यकारी संचालक (सांधिक नियोजन), महावितरण.
४) प्रादेशिक कार्यकारी संचालक - १ म.रा.वि.वितरण कंपनी मर्यादित, कल्याण.
५) प्रादेशिक कार्यकारी संचालक - २ म.रा.वि.वितरण कंपनी मर्यादित, पुणे .
६) प्रादेशिक कार्यकारी संचालक - ३ म.रा.वि.वितरण कंपनी मर्यादित, नागपूर.
७) संचालक (दक्षता व सुरक्षा), महावितरण.

**प्रत रवाना :-**

१) मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा/(कर्मचारी वर्ग)/(तांत्रिक आस्थापना))/(माहिती व तंत्रज्ञान) / (अं.ले.प.)/ (सांघीक संवाद), महावितरण, मुंबई.

२) मुख्य अभियंता (वितरण)/(अं.सु.)/(वि.ख.)/(पायाभुत सुधारणा)/ (ए.पी.डी.पी.आर.पी.)/(चाचणी कक्ष) महावितरण,
४) महाव्यवस्थापक (तांत्रिक)/ (वित्त संस्था)/(भंडार देयक)/(तपासणी नियंत्रण कक्ष),(वाणिज्य) (पायाभूत सुधारणा) महावितरण, मुंबई.
५) मुख्य अभियंता, (प्रशिक्षक संशोधन व विकास), महावितरण, नाशिक.
६) मुख्य विधि सल्लागार, महावितरण, मुंबई.
७) मुख्य जनसंपर्क अधिकारी, महावितरण, मुंबई.
८) उप संचालक (द व सु), महावितरण, मुंबई/ पुणे/नागपूर.
९) कंपनी सचिव, महावितरण, मुंबइ
१०) अधिक्षक अभियंता (विनिक), महावितरण, मुंबई
११) मा. व्यवस्थापकीय संचालक, यांचे विशेष कार्य अधिकारी, महावितरण, मुंबई
१२) अतिरिक्त महाव्यवस्थापक, संगणक केंद्र, महावितरण, नागपूर/औरंगाबाद/अकोला/ नाशिक/नेरुळ/भांडुप/कोल्हापूर/कल्याण.
१३) प्रणाली विश्लेषक, संगणक केंद्र, महावितरण, भंडारा/बुलढाणा/धुळे/जळगाव/लातूर/नांदेड/पेण/सातारा/सोलापूर.
१४) अनदेशक, संगणक केंद्र, महावितरण, अहमदनगर/अमरावती/चंद्रपूर/ पालघर/रत्नागिरी/सांगली/यवतमाळ.
१५) निवासी वरिष्ठ लेखा परिक्षण अधिकारी, (शा.ले.प.), महावितरण, प्रकाशगड/प्रकाशगंगा.
१६) सर्व भरारी पथके, महावितरण,

**प्रत सस्नेह रवाना :**

उपाध्यक्ष (भिवंडी ऑपरेशन), टोरंट पावर लिमिटेड,
जुना आग्रा रोड, अंजुर फाटा, भिवंडी- ४२१०३०२.

मु. अ./ ... तारीख -7 NOV ... 2415 ...|11|09.

मध्यवर्ती ... विभाग आवक क्र. 2806 दिनांक 6|11|09

महाराष्ट्र [redacted]

क्रमांक : [redacted] प्र.क्र. ८६८ /ऊर्जा-५

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,

मंत्रालय, मुंबई - ४०००३२.

दिनांक :- 4 NOV 2009

प्रति,

व्यवस्थापकीय संचालक,

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं मर्या.

प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१.

विषय :- राज्यातील मराठवाडा व विदर्भातील चंद्रपूर व यवतमाळ जिल्हे व उर्वरित महाराष्ट्रातील टंचाईग्रस्त तालुक्यात टंचाई सदृश्य परिस्थिती जाहिर करुन आवश्यक उपाययोजना करणे.

महोदय,

उपरोक्त विषयाचा उप सचिव महसूल व वन विभाग यांनी मा.सचिव ऊर्जा यांना अग्रेषित केलेला क्रमांकः एससीवाय २००९/प्र.क्र.९७/म-७ दिनांक ०७/०८/२००९ चा शासन निर्णय सोबत जोडला आहे.

कृपया प्रस्तुत शासन निर्णयाच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करावी हि विनंती.

आपला विश्वासू

(प्र. रा. नाईक)

शासनाचे अवर सचिव

CE (Comm) pl

EE (C) pl.

AE (BR) pl.

EE (TE) pl.

15/11 17.11 18/11 18/11

**राज्यातील मराठवाडा व विदर्भातील चंद्रपूर व यवतमाळ जिल्हे व उर्वरित महाराष्ट्रातील टंचाईग्रस्त तालुक्यात टंचाई सदृश्य परिस्थिती जाहिर करुन आवश्यक उपाययोजना करणे.**

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक-एससीवाय२००९/प्र.क्र. ९७ /म-७
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ७ ऑगस्ट २००९

वाचा :- शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. एससीवाय २००९/ प्र. क्र. ९२/ म- ७ दि. २९/०७/२००९

**शासन निर्णय :**

राज्यात सन २००९-१० मध्ये पावसाची सुरवात उशीरा झाली परंतु संपूर्ण मराठवाडा भागात, विदर्भातील यवतमाळ, चंद्रपूर जिल्हयात व इतर जिल्हयातील काही तालुक्यामध्ये आजमितीस सरासरीच्या तुलनेत ५० टक्केपेक्षा कमी पाऊस पडला असल्यामुळे पिण्याच्या पाण्याची टंचाई व चारा टंचाई निर्माण झाली आहे. सध्या राज्यात ८४१ टँकर चालू असून त्यापैकी ६१३ टँकर मराठवाडा विभागात आहेत. सदरहू भागात पिक परिस्थिती अत्यंत असमाधानकारक आहे. या भागातील धरणात उपयुक्त पाणीसाठा अत्यल्प प्रमाणात उपलब्ध आहे. या सर्व परिस्थितीचा साकल्याने विचार करुन शासनाने सोबतच्या विवरण पत्र "अ" व विवरण पत्र "ब" मध्ये नमूद केलेल्या जिल्हयासमोर दर्शविलेल्या १२९ तालुक्यात टंचाई सदृश्य परिस्थिती जाहिर करण्याचा निर्णय घेतला आहे.

२. या अनुषंगाने टंचाईग्रस्त तालुक्यातील बाधित शेतक-यांना दिलासा देण्यासाठी खालील उपाययोजना करण्याचे शासन आदेश देत आहे :-

(१) जमीन महसूलात सूट द्यावी.

(२) सहकारी कर्जाचे रुपांतरण करावे.

(३) शेतक-यांच्या वीज बीलात ३३ १/३ % इतकी सूट दयावी.

(४) रो.ह.यो. अतंर्गत घेण्यात येणा-या कामाच्या निकषात गरजेनुसार शिथीलता द्यावी.

(५) दहावी व बारावीचे परिक्षा शुल्क माफ करावे.

(६) शेतीशी निगडित कर्जाच्या वसूलीस स्थगिती दयावी.

३. या व्यतिरिक्त बाधित जिल्हयांतील त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या तालुक्यात खालील अतिरिक्त उपाययोजना करण्याचेही शासन आदेश देत आहे.

(अ) या सर्व तालुक्यातील रब्बी हंगामाचे नियोजन करुन बाधित शेतक-यांना अनुदान तत्वावर निविष्ठा संच स्वरुपात मदत कृषी विभागाने उपलब्ध करुन द्यावी.

(ब) दुबार पेरणी शक्य असल्यामुळे नवीन पेरासाठी सुर्यफुल, मका इ. पिकांचे अनुदानित बियाणे बाधित शेतक-यांना वाटप करावे.

(क) या सर्व जिल्हा/तालुक्यांमध्ये आवश्यकते नुसार चारा डेपो उघडण्यात यावे व ७५ % सवलतीच्या दराने प्रती कुटूंब ५ जनावरे या मर्यादेत चारा वाटप करावे. मागिल वर्षाच्या खर्चाच्या मानाने निर्धारण केल्यास यासाठी अंदाजे रुपये १०० कोटी लागतील व त्यासाठी तेवढी तरतूद उपलब्ध करुन देण्यात येईल.

(ड) चारा खरेदीसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करुन त्या समितीने चारा खरेदी व वाहतूकीचा दर निविदा मागवून निश्चित करावा.

(इ) राज्यातील कृषी विद्यापीठे, तालुका बीजगुणन केंद्रे, पशुसंवर्धन व दुग्धविकास विभागांतर्गत असलेल्या फार्मस मधील उपलब्ध चारा राखीव ठेऊन टंचाईग्रस्त भागातील शेतक-यांना वाटप करण्यासाठी जिल्हाधिका-यांचे अधिनस्त ठेवावा.

(फ) चारा निर्मिती कार्यक्रमास प्रोत्साहन म्हणून अनुदानित चारा बियाण्याचे वाटप पशुसंवर्धन व दुग्धविकास विभागाने करावे.

(ग) ३१ जुलै, २००९ पुर्वी पेरण्या करणे शक्य न झालेल्या शेतक-यांना पिक विमा भरता आला नसेल तर त्यासाठी दि. ३१.८.२००९ पर्यंत मुदतवाढ द्यावी.

(ह) जिल्हयाला मंजूर झालेली पिक विम्याची रक्कम तात्काळ संबंधित शेतक-यांच्या खात्यावर जमा करावी.

४. सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी आपल्या अधिपत्याखालील क्षेत्रीय अधिकाऱ्यांना आवश्यक आदेश स्वतंत्ररित्या निर्गमित करावेत. तसेच सर्व जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्तांनी या शासन निर्णयाच्या अमंलबजावणीवर वैयक्तीक लक्ष ठेवावे.

५. तसेच वरील सर्व उपाययोजना व सवलती दिनांक १५ ऑगस्ट,२००९ पर्यन्त ज्या तालुक्यांमध्ये पर्जन्यमान सरासरीच्या तुलनेत ५० % पेक्षा कमी असेल त्या सर्व तालुक्यांनाही लागू होतील. याबाबतचा शासन निर्णय स्वतंत्ररित्या दिनांक १५ ऑगस्ट,२००९ नंतर निर्गमित करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

(मिलिंद गवादे)
उपसचिव
महसूल व वन विभाग

प्रत,

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
अप्पर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग
अपर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग
प्रधान सचिव (नियोजान), नियोजन विभाग
प्रधान सचिव (वने), महसूल व वन विभाग

प्रधान सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग
प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग
प्रधान सचिव, महिला व बालकल्याण विभाग
प्रधान सचिव (पदुम), कृषी व पदूम विभाग
प्रधान सचिव (कृषी), कृषी व पदूम विभाग
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
प्रधान सचिव, नगर विकास विभाग,
प्रधान सचिव (जलसंधारण व रोहयो), ग्रामविकास विभाग
प्रधान सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
प्रधान सचिव (उर्जा), उद्योग, उर्जा व कामगार विभाग
सचिव, जलसंपदा विभाग
आयुक्त, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे,
महालेखापाल -१/२(लेखा आज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
महालेखापाल -१/२(लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
वित्त विभाग (व्यय-९ / कोषा -५), वित्त विभाग
संचालक, माहिती व प्रसिध्दी संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
कार्यासन अधिकारी, सर्व कार्यासने, महसूल व वन विभाग
निवडनस्ती, म-७ कार्यासन, महसूल व वन विभाग.
प्रत माहितीसाठी,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, / मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.मुख्य सचिव, / सर्व विभागांचे सचिव,
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक.

**शासन निर्णय क्रमांक-एससीवाय२००९/प्र.क्र. ९७ /म-७, दिनांक ७.८.२००९**

**सोबतचे विवरणपत्र "अ"**

| अ.क. | जिल्हा | तालुका |
|---|---|---|
| १ | नांदेड | १६ तालुके |
| २ | लातूर | १० तालुके |
| ३ | औरंगाबाद | ९ तालुके |
| ४ | जालना | ८ तालुके |
| ५ | बीड | ११ तालुके |
| ६ | परभणी | ९ तालुके |
| ७ | उस्मानाबाद | ८ तालुके |
| ८ | हिंगोली | ५ तालुके |
| ९ | चंद्पूर | १५ तालुके |
| १० | यवतमाळ | १६ तालुके |
| | एकुण | १०७ तालुके |

**विवरणपत्र "ब"**

| | | |
|---|---|---|
| १ | ठाणे | अंबरनाथ |
| २ | रायगड | पेण |
| ३ | नंदूरबार | नवापूर |
| ४ | जळगांव | भडगाव |
| ५ | अमरावती | धारणी |
| ६ | बुलढाणा | देऊळगावराजा |
| ७ | वाशिम | मानोरा |
| ८ | गडचिरोली | चामोरशी,कोरची,अहेरी |
| ९ | पुणे | वेल्हा, आंबेगाव |
| १० | सांगली | पलूस, जत |
| ११ | सोलापूर | उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, सांगोला,अक्कलकोट, पंढरपूर,मंगळवेढा,मोहोळ |
| १२ | कोल्हापूर | गगनबावडा |
| | एकूण | २२ तालुके |

-----------